# शासन आपल्या दारी योजना

## ➢ प्रस्तावना

'शासन आपल्या दारी\' उपक्रमाचा उद्देश सरकारी सेवा आणि लाभ घेताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करणे हा आहे. बऱ्याचदा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. अनेकदा नागरिकांना यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागतो.

"Shasan Aplya Dari Yojana" या योजनेच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यातील किमान एक लाख लाभार्थ्यांना शासन योजनेचा लाभ प्रत्यक्ष स्वरूपात देण्यात येईल, अशी हमी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील "शासन आपल्या दारी" या लोकाभिमुख योजनेच्या शुभारंभाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उद्योग मंत्री उदय सामंत, बंदरे व खनीकर्म मंत्री दादाजी भुसे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, आमदार रवींद्र फाटक, माजी आमदार सदानंद चव्हाण, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पवार, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किर्ती किरण पूजार, पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आपला उद्देश प्रामाणिक असला म्हणजे सर्व बाजूने लोक सोबत जोडले जातात. "शासन आपल्या दारी" हे अभियान देशात विक्रमी ठरेल आणि महाराष्ट्राचे उदाहरण देशासमोर राहील याची मला खात्री आहे. Shasan Aplya Dari हे एक क्रांतिकारी अभियान राज्यात सुरु झाले आहे. १३ मे रोजी पाटण येथून संपूर्ण राज्यात या अभियानाची सुरुवात झाली. आज २५ मे म्हणजे केवळ बारा दिवसांत लाखो लाभार्थींची नोंद यात होत आहे हे विशेष आहे.

### ➢ शासन आपल्या दारी योजना

'शासन आपल्या दारी\' या अभियानावर मुख्यमंत्री सचिवालयाचे पूर्ण नियंत्रण आणि देखरेख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, वीर सावरकर या महापुरुषांची भूमी असलेल्या रत्नागिरीत \'शासन आपल्या दारी\' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे, याचा आनंद होत आहे.

या अभियानाचा लाभ अधिकाधिक लोकांना व्हावा म्हणून आपण आता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेतो आहोत. महालाभार्थी या पोर्टलवर नोंदणी करून आपण योजनांचा लाभ घेऊ शकता. जिल्ह्यातील एमएससी आयटी केंद्रे, सीएससी केंद्रे तसेच कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मधून तेथील स्वयंसेवकांची मदत घेऊन आपण नोंदणी करू शकता आणि Shasan Aplya Dari योजनांचा लाभ घेऊ शकतात.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी संपूर्ण प्रशासन यंत्रणा युद्धपातळीवर, प्रत्यक्ष क्षेत्रावर उतरली पाहिजे. अशा सर्व यंत्रणांना सूचना होत्या. आज ग्राम सेवक, तलाठी, प्रांत अधिकारी स्वतः गावोगावी जाऊन

नागरिकांना भेटत आहेत आणि लाभ देत आहेत, योजनांची माहिती देत आहेत, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रशासकीय यंत्रणेचे कौतुक केले. Shasan Aplya Dari Yojana

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, सातारा जिल्ह्यात या अभियानाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. अहमदनगर जिल्हा तसेच ठाणे जिल्ह्याने सुद्धा यापासून प्रेरणा घेत या अभियानासाठी नोंदणी शिबिरे घेतली आहेत.

कल्याणमध्ये दीड लाख लाभार्थींना लाभ देत आहोत. Shasan Aplya Dari Yojana गडचिरोलीसारख्या ठिकाणी दोन महिन्यात एक लाख लाभार्थींची नोंद झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार, तालुक्यात १५ हजार आणि गावात किमान १०० लाभार्थींना Shasan Aplya Dari योजनांचा लाभ मिळालाच पाहिजे यादृष्टीने सर्व तयारी झाली आहे. या अभियानासाठी १६ हजार योजना दूत नेमले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयात जनकल्याण कक्ष सुरु करण्यात आला आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा जनकल्याण कक्ष सुरू केले आहेत. गेल्या 11 महिन्यात ३५ मंत्रिमंडळ बैठका आणि त्यातून ३५० निर्णय हे सर्वसामान्य माणसांच्या हिताचे घेण्यात आले आहेत. सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात सुखी समाधानाचे दिवस यावेत, शासनाविषयी जनतेच्या मनात सकारात्मक भावना निर्माण व्हाव्यात हा या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे.

## ➢ सर्व योजना घर बसल्या मिळणार

शासन आणि प्रशासन ही रथाची दोन चाके आहेत ही दोन्ही चाके विकास होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. एसटीच्या 50 टक्के सवलतीमुळे महिलांचा प्रवास वाढला आहे. एसटीने दिलेल्या सवलतीमुळे जेष्ठांच्या प्रवासात वाढ झाली आहे.

एमएमआरडीएच्या धर्तीवर कोकण विकास क्षेत्र प्राधिकरणाच्या माध्यमातून कोकणाचा सर्वांगीण विकास साधण्यात येत आहे. कोकणात दहा हजार मल्टिनॅशनल कंपन्यांनी नोंदणी केली आहे. यातून राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल. केंद्र सरकार यासाठी मदत करत आहे. मुंबई-गोवा

महामार्गाचे काम लवकरच पूर्ण होत आहे. मुंबई- सिंधुदुर्ग महामार्ग तयार होणार आहे, त्यामुळे प्रवासाचा वेळ वाचेल असेही त्यांनी सांगितले.

\'शासन आपल्या दारी\' या योजनेविषयी बोलताना पालकमंत्री श्री. सामंत म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीतला हा पहिला कार्यक्रम आहे, ज्यात अधिकारी गावोगावी, घरोघरी जाऊन योजना लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत, प्रत्येक वर्गाला लाभ मिळाला पाहिजे, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. रिक्षा चालक आणि मालकांसाठी महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने Shasan Aplya Dari Yojana घेतला आहे त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होईल. संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावण बाळ योजना या योजनेपासून रत्नागिरी जिल्ह्यातील एकही लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री श्री. सामंत यांनी यावेळी दिली

'शासन आपल्या दारी\' या योजनेच्या शुभारंभासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दुचाकी व तीन चाकी गाड्यांचे वाटप मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

## ➢ शासन आपल्या दारी योजना अभियान 2023 चे उद्दिष्ट्य

शासन आपल्या दारी' या योजनेचा मुख्य उद्देश सरकारी सेवा आणि लाभ घेताना नागरिकांना येणाऱ्या अडचणीचे निवारण करणे आहे. बऱ्याचदा, एखाद्या व्यक्तीला जर सरकारी योजनेसाठी अर्ज करायचा असेल तर बऱ्याच प्रक्रियांमधून जावे लागते, अनेक कार्यालयांना भेट द्यावी लागते त्याचप्रमाणे विविध कागदपत्रे साधार करावे लागतात आणि या सर्व प्रक्रियेमध्ये बराच कालावधी जातो.

सामान्य व्यक्तीच्या या सर्व अडचणींचे निवारण करण्यासाठीच या अभियानाची सुरुवात माननीय मुख्यमंत्र्यानी केली आहे. जेणेकरून त्यांना सर्व सरकारी उपक्रमांचा फायदा एकाच ठिकाणी मिळू शकेल.

## ➢ वैशिष्ट्ये आणि फायदे

योजनेची काही प्रमुख वैशिष्ट्ये आणि फायदे खालीलप्रमाणे आहेत:

- ❖ मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमाची सुरुवात सातारा जिल्हयापासून केली.
- ❖ अधिका-यांमध्ये कार्यक्षम समन्वयाची हमी देण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात एक विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.
- ❖ आपली कामे पूर्ण करण्यासाठी किंवा दिलेल्या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागते. अज्ञानामुळे ते अनेकदा चांगल्या योजनांचा फायदा मिळवू शकत नाहीत.
- ❖ नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा यांनी 13 एप्रिल रोजी शासनाच्या सूचनेनुसार सर्व समस्या सोडविण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणार असल्याची घोषणा केली.
- ❖ जिल्हा नियोजन आणि विकास समिती (DPDC) आणि विधानसभा सदस्य लोकल एरिया डेव्हलपमेंट स्कीम (MLALAD) निधी, प्रत्येकी 20 लाख रुपयांचा, दोन्ही उद्देशांसाठी वापरला जाऊ शकतो.

## ➢ योजना काय काय असतील

- कृषी सेवा केंद्राचे परवाने
- सेवानिवृत्त लाभ
- आधार कार्ड

- पॅन कार्ड
- पासपोर्ट
- ई-श्रम कार्ड
- भरती मेळावा
- पीएम किसान
- विवाह नोंदणी
- पीएफ घरकुल योजना
- मनरेगा
- जॉब कार्ड
- मुलींना सायकल वाटप
- नवीन मतदार नोंदणी
- शेतकरी ते ग्राहक बाजारपेठ
- कृषी प्रदर्शन
- डिजिटल इंडियासखी
- किट वाटप
- दिव्यांग साहित्य वाटप
- शिकाऊ चालक परवाना
- महाराष्ट्र लेक लाडकी योजना
- माझी कन्या भाग्यश्री योजना
- महाराष्ट्र नव तेजस्विनी योजना
- सौर कृषी वाहिनी योजना
- नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना

अशा विविध शासकीय योजनेचा या योजनेअंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे.

शासन आपल्या दारी या योजनेचा मुख्य उद्देश हा आहे की शासनाच्या विविध योजनांचा आणि उपक्रमाचा लाभ सर्वसामान्य जनतेला हा त्वरित मिळावा. सर्वसामान्याचे कामे ही स्थानिक पातळीवर पूर्ण व्हावेत, तसेच सर्वसामान्य जनतेला सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळावेत यासाठी ही योजना थेट जनतेच्या दारी जाणार आहे. आपल्या राज्यातील सर्वसामान्य जनता, महिला, विद्यार्थी, शेतकरी यांचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयात ही योजना राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात साधारणता 75000 लाभार्थ्यांना एकाच छताखाली या योजनेअंतर्गत लाभ मिळणार आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांना विविध सेवा देण्यात येत आहेत.

## ➢ शासन आपल्या दारी योजना, आवश्यक कागदपत्रे:

- आधार कार्ड
- पॅन कार्ड
- कायम रहिवासी प्रमाणपत्र
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- मोबाईल नंबर

## ➢ शासन आपल्या दारी योजना लागू करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आपली दारी योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लोकांना दोन दिवसीय शिबिरात उपस्थित राहावे लागेल. या दोन दिवसीय शिबिरात दोनशेहून

अधिक कार्यक्रमांचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला शिबिरानुसार अर्ज करावा लागेल.

## ➢ शासन लागू दारी योजनेची काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत ::

1 : महाराष्ट्र लेक लाडकी योजना

राज्यातील मुलींचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लेक लाडकी योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील गरीब वर्गातील मुलींना शिक्षण घेण्यासाठी ७५,०००/- रुपयांची रोख रक्कम शासनाकडून दिली जाणार आहे. लेक लाडकी योजनेचा लाभ पिवळे आणि केशरी रेशनकार्ड असलेल्या कुटुंबातील मुलींना देण्यात येईल. या योजनेमुळे मुलींना आर्थिक सुरक्षा मिळेल, ज्यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेणे सोपे जाईल. या योजनेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारले जाऊ शकतात.

➢ महाराष्ट्र लेक लाडकी योजनेचे फायदे

- लेक लाडकी योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील मुलींना देण्यात येणार आहे.
- या योजनेद्वारे आर्थिक दुर्बल कुटुंबातील मुलींना आर्थिक मदत केली जाणार आहे.
- लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून मुलीच्या जन्मावर 5000 रुपये, पहिल्या वर्गात प्रवेश । घेतल्यावर 4000 रुपये, सहाव्या वर्गात प्रवेश घेतल्यावर 6000 रुपये, 11वीमध्ये प्रवेश घेतल्यावर - 11000 रुपये आणि पुढील अभ्यासासाठी. 75000/- ची मदत रक्कम दिली जाईल.

• लाभार्थ्यांना देण्यात येणारी मदत रक्कम रोख स्वरूपात दिली जाईल.

• पिवळ्या किंवा केशरी रंगाची शिधापत्रिका असलेल्या कुटुंबातील मुलींनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे.

• या योजनेअंतर्गत पात्र मुलींना त्यांचे शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

• लेच लाडकी योजनेचा लाभ घेण्यासाठी मुलींना प्रवृत्त केले जाईल.

• या योजनेमुळे आता मुलींना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

➢ लेक लाडकी योजनेसाठी पात्रता

• अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

• लाभार्थी मुलगी असावी.

• अर्जदाराचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल असावे.

• पिवळे किंवा केशरी शिधापत्रिका असलेल्या कुटुंबातील मुली या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

➢ लेक लाडकी योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

• आधार कार्ड

• कायम प्रमाणपत्र

• उत्पन्न प्रमाणपत्र

• बँक खाते

• पासपोर्ट आकाराचा फोटो

• मोबाईल नंबर

## 2 : माझी कन्या भाग्यश्री योजना

राज्यातील मुलींचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू केली आहे. त्याद्वारे राज्यातील कोणत्याही माता किंवा वडिलांनी जन्मानंतर एक वर्षाच्या आत नसबंदी करून घेतल्यास त्या मुलीच्या नावे 50 हजार रुपये शासनाकडून बँकेत जमा केले जातील. याशिवाय दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर पालकांनी कुटुंब नियोजनाचा अवलंब केला असेल, तर नसबंदीनंतर दोन्ही मुलींच्या नावावर 25000-25000 रुपये बँकेत जमा केले जातील.

माझी कन्या भाग्यश्री योजनेमुळे राज्यातील मुलींचे सक्षमीकरण होणार असून मुलींचे प्रमाणही सुधारेल. यामुळे लिंग निर्धारण आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यातही मदत होईल. ही योजना मुलींना शिक्षणाकडे वळवेल आणि राज्यातील लोकांची नकारात्मक विचारसरणी बदलण्यासाठीही प्रभावी ठरेल.

- माझी कन्या भाग्यश्री योजनेतील प्रमुख तथ्ये

'माझी कन्या भाग्यश्री योजने अंतर्गत महाराष्ट्रातील एकाच व्यक्तीच्या 02 मुलींनाच लाभ दिला जाईल ज्या अंतर्गत एका मुलीच्या जन्मानंतर 1 वर्षाच्या आत आणि दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर 6 महिन्यांच्या आत पालकांना नसबंदी करणे बंधनकारक असेल. या योजनेंतर्गत, पूर्वी दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपये निश्चित करण्यात आले होते. मात्र आता नवीन धोरणानुसार योजनेंतर्गत पात्र कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपयांवरून 7.5 लाख रुपये करण्यात आले आहे.

- माझी कन्या भाग्यश्री योजनेसाठी पात्रता

• लाभार्थी कुटुंब महाराष्ट्र राज्यांचे कायमचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

• लाभार्थी कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ₹7.5 लाख असणे आवश्यक आहे.

- लाभार्थी कुटुंबाला 2 मुली असणे आवश्यक आहे.
- दोन्ही मुलीची जन्मतारीख १ जानेवारी २०१४ किंवा त्यानंतरची असणे आवश्यक आहे.
- लाभार्थी कुटुंबाला मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत किंवा ती शाळा सोडेपर्यंत नसबंदी करून घ्यावी लागते
- तिसऱ्या मुलाच्या जन्मानंतर, आधीच जन्मलेल्या दोन मुलींना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

## ➢ आवश्यक कागदपत्रे

- अर्जदाराचे आधार कार्ड
- पत्त्याचा पुरावा
- उत्पन्न प्रमाणापत्र
- आईचे किंवा मुलीचे बँक खाते
- मोबाईल नंबर
- पासपोर्ट आकाराचा फोटो

## ➢ माझी कन्या भाग्यश्री योजनेचे लाभ

- माझी कन्या भाग्यश्री योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील मुलींना देण्यात येणार आहे.
- याचा लाभ एका कुटुंबातील 02 मुलींना मिळणार आहे.
- प्राप्तकर्ता मुलगी आणि तिची आई प्रत्येकी नॅशनल बँकेत संयुक्त खाते तयार करतील, ज्यामध्ये रु. १ लाख अपघात विमा पॉलिसी आणि रु. 5000 ओव्हरड्राफ्ट.
- मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन केल्यास पात्र कुटुंबाला सरकारकडून 50,000 रुपये मिळतील.
- दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन केल्यास सरकार प्रत्येक मुलीला २५ हजार रुपये अनुदान देईल.
- मुलीच्या शिक्षणाचा खर्च सरकार रोखीने करू शकते.
- महाराष्ट्रातील अधिकाधिक कुटुंबांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी शासनानै कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा 1 लाख रुपयांवरून 7.5 लाख रुपये केली आहे.
- या योजनेनुसार, मुलींच्या पालकांना एका मुलीच्या जन्माच्या 1 वर्षाच्या आत किंवा दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या 6 महिन्यांच्या आत नसबंदी करणे बंधनकारक असेल.

**3 : महाराष्ट्र सौर कृषी वाहिनी योजना**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत 2025 सालापर्यंत सौर ऊर्जेपासून 7000 मेगावॅट वीजनिर्मिती केली जाणार असून येत्या 3 वर्षात राज्यात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी केवळ 3 रुपये प्रति युनिट दराने वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री ऐवजी दिवसा वीज उपलब्ध होणार आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी देता येणार आहे. त्यामुळे पिकांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल.

## ➢ महाराष्ट्र सौर कृषी वाहिनी योजनेचे मुख्य मुद्दे

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2017 मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली होती आणि आता या योजनेची दुसरी आवृत्ती MSKVY 2.0 मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लॉन्च करण्यात आली आहे. आम्ही तुम्हाला सांगूया या योजनेद्वारे महाराष्ट्र सरकार सन 2025 पर्यंत सौर उर्जेपासून 7000 मेगावॅट वीज निर्मिती करणार आहे. ज्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

सौर कृषी वाहिनी योजना टप्पा 2 ची सुरुवात सन 2025 च्या अखेरीस महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील 30% कृषी फीडर सौर ऊर्जेने करता यावी या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. सौरऊर्जा निर्मिती करून हजारो तरुणांना रोजगार मिळू शकणार आहे.

शेतकऱ्यांना सोलर पॅनल बसवण्यासाठी सरकारकडून भाडेही दिले जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारच्या सौर कृषी वाहिनी योजनेतर्गत 33/11 KV च्या आसपास सौर पॅनेल बसवण्यात येणार आहेत. ज्या शेतकऱ्याच्या शेतात राज्य सरकार सौर पॅनेल बसवणार आहे, त्यांना भाडेही दिले जाईल. त्यापैकी महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांना रु. 125000/- प्रति हेक्टर दराने

भाडे देणार आहे. सौर कृषी वाहिनी योजनेसाठी, महाराष्ट्र सरकार 3 वर्षांत सौर पॅनेलमधून 7000 मेगावॅट वीज निर्मिती करेल, त्यासाठी 28000 एकर जमीन महाराष्ट्र सरकार वापरणार आहे.

## ➢ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचे लाभ

• महाराष्ट्र सरकारने राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे.

• या योजनेच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी केवळ 3 रुपये प्रति युनिट दराने वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे.

• या योजनेमुळे शेतकऱ्यांना आता रात्री ऐवजी दिवसा वीज मिळणार आहे.

• दिवसा वीज उपलब्ध असल्याने पिकांना योग्य वेळी पाणी मिळेल, त्यामुळे पिकांच्या उत्पादनात वाढ होणार आहे.

• या योजनेचा विस्तार करण्यासाठी येत्या ३ वर्षात संपूर्ण राज्यात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

• सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारल्यास त्यांना भाडेही मिळेल.

• सौरऊर्जा प्रकल्प उभारल्याने राज्यात रोजगाराच्या संधी वाढणार आहेत.

## ➢ सौर कृषी वाहिनी योजनेची ठळक वैशिष्ट्ये

• राज्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे

- बेरोजगारीचा दर खाली आणा
- शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त करणे
- शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी
- पात्र लाभार्थ्यांना स्वावलंबी आणि सशक्त बनवणे.

## ➢ महाराष्ट्र सौर कृषी वाहिनी योजनेसाठी पात्रता

- लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- राज्यातील शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरणार आहेत.
- अर्जदाराचे बँक खाते आधारशी जोडलेले असावे.
- शेतकऱ्यांव्यतिरिक्त, इतर लाभार्थी देखील या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत जसे की-
- साखर कारखाना
- ग्रामपंचायत
- शेतकऱ्यांचा गट
- सहकारी संस्था
- उद्योगपती

## 4 : महाराष्ट्र नव तेजस्विनी योजना

राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने नव तेजस्विनी योजना लागू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य सरकारकडून मदत दिली जाते, जेणेकरून महिलांची स्थिती सुधारता येईल.

राज्यातील महिलांच्या कल्याणासाठी राज्य सरकारने नव तेजस्विनी योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत महिलांना दारिद्र्यरेषेतून बाहेर येण्यासाठी आर्थिक मदत केली जाते. यासोबतच महिलांना कमी व्याजदरात कर्जही उपलब्ध करून दिले जाते, जेणेकरून त्या या कर्जाचा वापर करून स्वतःचा व्यवसाय करू शकतील. राज्यातील ग्रामीण भागातील सुमारे 10 लाख कुटुंबांना नव तेजस्विनी योजनेचा लाभ मिळणार आहे.

### ➢ महाराष्ट्र नव तेजस्विनी योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

- राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आर्थिक मदत करणे
- महिला स्वतःचा व्यवसाय करू शकतील
- महिला सक्षमीकरणाला चालना मिळेल
- महिलांना योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त केले जाईल
- पात्र लाभार्थ्यांना स्वावलंबी आणि सशक्त बनवले जाईल.

### ➢ महाराष्ट्र नव तेजस्विनी योजनांचे फायदे

• नव तेजस्विनी योजनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील रहिवाशांना देण्यात येणार आहे.

• या योजनेच्या माध्यमातून राज्यातील आर्थिक दुर्बल महिलांना आर्थिक मदत दिली जाणार आहे.

• महिलांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढण्यासाठी शासनाकडून मदत केली जाईल.

• ज्या महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे, त्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाईल.

• लाभार्थ्यांना दिलेली कर्जाची रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात जमा केली जाईल.

• नव तेजस्विनी योजनेचा राज्यातील सुमारे 10 लाख कुटुंबांना लाभ होणार आहे.

• या योजनेसाठी इंटरनॅशनल फंड (IFAD) 333 कोटी रुपये अनुदान देणार असून 190 कोटी रुपये राज्य सरकार देणार आहेत.

• ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे.

• या योजनेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारले जाऊ शकतात.

## ➢ नव तेजस्विनी योजनेसाठी पात्रता

- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- ग्रामीण भागातील महिला या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना या योजनेचा लाभ मिळू शकेल.
- अर्जदाराचे बँक खाते आधारशी जोडलेले असावे.

## ➢ महाराष्ट्र नव तेजस्विनी योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

- आधार कार्ड
- कायम प्रमाणपत्र
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- बँक खाते
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- मोबाईल नंबर

## 5 : महाराष्ट्र नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना

राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना लागू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या मदतीने दरवर्षी मदत दिली जाणार आहे. त्याच्या मदतीने शेतक-यांचे उत्पन्न वाढेल व त्यांना शेती करण्यास प्रोत्साहन देता येईल.

राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून रु.6000/- आणि केंद्र सरकारच्या सन्मान निधी योजनेंतर्गत रु.6000/- ची आर्थिक मदत दिली जाईल. म्हणजे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना दरमहा रु.1000/- ची आर्थिक मदत मिळेल. लाभार्थी शेतकऱ्यांना दिलेली ही मदत रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर डीबीटी पद्धतीने पाठवली जाईल. आम्ही तुम्हाला सांगतो की नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेचा राज्यातील सुमारे १.१५ कोटी कुटुंबांना थेट फायदा होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल आणि त्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त केले जाईल.

## ➢ महाराष्ट्र नमो शेतकरी महा सन्मान फायदे निधी योजनेचे

- महाराष्ट्र सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे.

- या योजनेद्वारे शेतकऱ्यांना 6000/- रुपये राज्य सरकार आणि 6000/- केंद्र सरकारकडून दिले जातील.

- लाभार्थी शेतकऱ्यांना मिळालेली ही रक्कम त्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाईल.

- महाराष्ट्राच्या या नव्या योजनेचा थेट लाभ राज्यातील 15 कोटी कुटुंबांना होणार आहे.

- या योजनेमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या मजबूत होतील.

- ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे, जेणेकरून पात्र लाभार्थ्यांना नमो शेतकरी महाआवाज निधि योजनेचा लाभ घेता येईल.

- नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेसाठी शेतकऱ्यांसाठी खर्च होणारी रक्कम सरकार भरणार आहे.

- या योजनेसाठी सरकारवर 6900 कोटी रुपयांचा आर्थिक बोजा पडणार आहे.

## ➢ पात्रता निकष

- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे
- लाभार्थी हा शेतकरी असावा.
- शेतकऱ्याकडे स्वतःची जमीन असावी.
- अर्जदाराने महाराष्ट्राच्या कृषी विभागाकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.
- लाभार्थीचे बँक खाते आधारशी जोडलेले असावे.

➢ आवश्यक कागदपत्रे

- आधार कार्ड
- कायम प्रमाणपत्र
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र
- जमिनीची कागदपत्रे
- पासपोर्ट आकाराचा फोटो
- मोबाईल नंबर

## ➢ निष्कर्ष

शासन आपल्या दारी ही योजना खरोखरच सर्वांसाठी फायद्याची असणारी योजना आहे. या योजनेमुळे तुमचा शासनाच्या कामातील सहभाग वाढणार आहे. पूर्वी जे काम करायला तुम्हाला खूप कालावधी लागत असेल असे कामे आता काही दिवसात पूर्ण होणार आहेत. तसेच ते कामे पूर्ण करण्यासाठी ज्या कागदपत्राची तुम्हाला

आवश्यकता भासत होती. ती सर्व कागदपत्रे तुम्हाला आता एकाच छताखाली मिळणार आहेत. या शासन आपल्या दारी योजनेमुळे सर्वसामान्य जनतेचा पैसा आणि वेळ या दोन्ही गोष्टी वाचणार आहेत. ही योजना एक शासनाची महत्त्वकांक्षी योजना आहे. तसेच या योजनेमुळे सर्वसामान्य जनतेच्या दारामध्ये जाऊन महाराष्ट्र शासना अंतर्गत येणारे कामे पूर्ण होणार आहेत.

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांच्या फायद्यासाठी विविध योजनांची सुरुवात करत असते परंतु बऱ्याच नागरिकांना या योजनांची माहिती नसते तर बऱ्याचदा नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी सरकारी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात व अनेकदा नागरिकांना यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागतो ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसाच वाया जातो व योजनांचा लाभ देखील मिळत नाही त्यामुळे शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व जाती धर्मातील लोकांना शासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या सर्व योजनांचा कुठल्याही अडथळ्याविना लाभ घेता यावा या उद्देशाने शासन आपल्या दारी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत तहसील कार्यालय, पंचायत समितीचा आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, कृषी, एकात्मिक बाल विकास, भूमिअभिलेख, पशुवैद्यकीय आदी विभागांतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे.यामध्ये शिधापत्रिका, शासकीय प्रमाणपत्र (वय, राष्ट्रीयत्व, अधिवास, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला), मतदारनोंदणी, आधार नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी योजना, सलोखा योजना, प्रधानमंत्री मातृवंदन योजना, कुटुंबकल्याण योजना, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, कन्या समृद्धी योजना, विवाहनोंदणी,कुपोषित बालकांची तपासणी, जमीनमोजणी, भूमापन, प्रॉपर्टी कार्ड, कृषी अवजारांचे वाटप, बियाणे औषध वाटप, महा डीबीटी नोंदणी, जनावरांची तपासणी शिबिर, किसान क्रेडिट कार्ड, पशुसंवर्धन प्रशिक्षण, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, रमाई घरकुल योजना, सुकन्या समृद्धी योजना, आधार जोडणी आदी सरकारी योजनांचा समावेश आहे